# कोल्हापूर महिला सहकारी बँक लि, कोल्हापूर

मुख्य कार्यालय - १०८२ ख बी वॉर्ड तुतूची बाग, खासबाग, कोल्हापूर. फोन २५५०४२१/२२ Email:ho@kopmahilabank.com

## वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस (फक्त भागधारक सभासदांसाठी)

आपल्या बँकेची सन २०२२-२०२३ चे अहवाल सालची ५० वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक १३ सप्टेंबर, २०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता राजर्षी छत्रपती शाहू स्मारक भवन, दसरा चौक, कोल्हापूर येथे भरणार असून या सभेत खालील विषयावर विचार-विनिमय करण्यात येणार आहे. तरी सदर सभेस आपण वेळेवर उपस्थित रहावे, अशी विनंती आहे.

## ● सभेपुढील विषय ●

१) दिनांक २२ सप्टेंबर,२०२२ रोजी संपन्न झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

२) सन २०२२-२०२३ सालचे प्रतिवृत्त, ताळेबंद व नफा-तोटा पत्रके स्विकृत करणे व मंजुरी देणे.

३) संचालिका मंडळाने सुचविलेले सन २०२२-२०२३ अखेरच्या नफा विभागणीस व लाभांश जाहीर करुन वितरणास मंजूरी देणे.

४) सन २०२२-२०२३ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास आणि सन २०२३-२०२४ चे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रकास मंजूरी देणे आणि प्रगती तक्त्याची नोंद घेणे.

५) सन २०२१-२०२२ च्या वैधानिक लेखापरिक्षण दोष दुरुस्ती अहवालावर चर्चा करणे व अहवाल स्विकारणे.

६) वैधानिक लेखापरिक्षक मे. पाटील घेवडे महापूरकर ॲण्ड असोसिएटस् कोल्हापूर सी. ए. आणि अंतर्गत लेखापरिक्षक मे. सुधाकर कुलकर्णी ॲण्ड कंपनी, सातारा, सी.ए. यांचेकडून सन २०२२-२०२३ सालाकरिता आलेल्या अहवालावर विचार करणे.

७) सन २०२३-२०२४ करिता वैधानिक लेखापरिक्षकांचे नेमणुकीबाबत संचालक मंडळाने शिफारस केलेनुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया यांचे निकषास अधीन राहून नेमणुक करणे व मेहनताना ठरविणे.

८) बँकेच्या संचालिका मंडळ सदस्या व त्यांचे नातेवाईक यांच्या सन २०२२-२०२३ साल अखेर येणे असलेल्या कर्जाची नोंद घेणे.

९) बँकेच्या संचालिका मंडळाने सुचविलेल्या उपविधी दुरुस्तीबाबत विचार करुन निर्णय घेणे.

१०) महाराष्ट्र शासनाच्या एक रक्कमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत सवलत दिलेल्या थकीत कर्ज खात्यांची माहिती घेणे व संचालिका मंडळाच्या निर्णयाची नोंद घेणे.

११) वार्षिक सर्वसाधारण सभेस सभासदांच्या अनुपस्थितीस माफी देणेबाबत विचार करणे.

१२) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

स्थळ : कोल्हापूर

दिनांक : ११/०८/२०२३

मान. संचालिका मंडळाचे आज्ञेवरुन

(जे.के.कुंभार)
महाव्यवस्थापक

**महत्त्वाची सूचना :**

अ) गणसंख्येअभावी सभा-तहकूब झालेस सदर सभा त्याच दिवशी वरील ठिकाणी अर्ध्या तासाने सुरु होईल आणि या सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.

ब) बँकेचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक, उपविधी दुरुस्ती मसुदा आणि लेखापरिक्षण अहवाल बँकेच्या मुख्यालय आणि शाखा कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द केलेला आहे. अहवाल प्रत बँकेच्या मुख्यालयातून लेखी मागणी करुन उपलब्ध होईल. नोटीस व आर्थिक पत्रके बँकेच्या वेबसाईटवर पाहणेस उपलब्ध आहेत.

क) या सभेच्या विषयासंदर्भातील विचारावयाचे प्रश्न दिनांक ०७/०९/२०२३ पर्यत बँकेच्या मुख्य कार्यालयात महाव्यवस्थापक यांचेकडे लेखी द्यावयाचे आहेत.

ड) उपस्थित सभासदांना सभेस उपस्थित राहील्याबद्दल उपस्थिती प्रमाणपत्र देणेत येणार आहे. सभासदांनी सभेस येताना सभा नोटीस व बँक ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

## श्रध्दांजली :

अहवाल सालात बँकेचे जे सभासद, ठेवीदार, खातेदार, ग्राहक, हितचिंतक, संशोधक, शास्त्रज्ञ, साहित्यिक, लेखक, कलावंत, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, बँकीग व सहकार क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती दिवंगत झालेल्या आहेत. त्यांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करुन सर्वांचे आत्म्यास सद्‌गती व चिरंतन शांती लाभो, अशी ईश्वर चरणी प्रार्थना करुया.

## सन २०२२-२०२३ चे प्रतिवृत्त :

**सन्माननीय सभासद बंधू/ भगिनीनो,**

आपल्या बँकेची १९ मे १९७२ रोजी स्थापना झालेली असून बँकेस ५० वर्षे पूर्ण झालेली आहेत बँकेच्या सुवर्णमहोत्सवी वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित असणाऱ्या सभासद बंधु/भगिनीचे मी संचालिका मंडळाच्यावतीने स्वागत करते.

आपणा सर्व सभासद ठेवीदार, खातेदार, ग्राहक आणि हितचिंतकांच्या सहकार्याने आपल्या बँकेने कोल्हापूर जिल्ह्याच्या नागरी सहकारी बँकींग क्षेत्रात गेल्या ५० वर्षापासून महिलांनी सर्वाकरीता चालविलेली एक यशस्वी बँक म्हणून नावलौकिक निर्माण केलेला आहे. सुवर्णमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधत सोनेरी रंगाचे नाणे आणि मध्यभागी २१ व्या शतकातील आव्हानास सामोरी जाणारी महिला, अशा संकल्पनेचे नवीन **"बोधचिन्ह"** संचालिका मंडळाने स्विकृत केलेले आहे. आपणा सर्व सभासदांचे माहीतीकरीता नवीन बोधचिन्हाचे अहवालाच्या मुखपृष्ठावर सादरीकरण केलेले आहे. या बोधचिन्हातून बँकेच्या विश्वासार्यतेची नवीन ओळख होणार आहे.

सन २०२२-२०२३ सुवर्णमहोत्सवी वर्षाचे बँक कामकाजाचे प्रतिवृत, ताळेबंद व नफा-तोटापत्रक इत्यादी आर्थिक पत्रके आजच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत आपणासमोर सादर करताना मला आनंद होत आहे.

## तुलनात्मक सांपत्तिक आकडेवारी:

दिनांक ३१ मार्च, २०२३ अखेरची तुलनात्मक सांपत्तिक आकडेवारी खालील प्रमाणे आहे. (आकडे लाखांत)

| अ. नं. | तपशील | ३१/०३/२०२२ | ३१/०३/२०२३ | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| १ | सभासद संख्या | १२१६६ | १२३२२ | +१५६ |
| २ | भाग भांडवल | ४१८.६९ | ४५७.६६ | +३८.९७ |
| ३ | रिझर्व्ह व इतर फंड | १०४४.२७ | ११४२.७७ | +९८.५० |
| ४ | ठेवी | ९५१८.६३ | ९७८७.९१ | +२६९.२८ |
| ५ | गुंतवणूक | ५२९५.७७ | ५०३५.१६ | -२६०.६१ |
| ६ | कर्जे | ५१६४.९५ | ५८९७.१३ | +७३२.१८ |
| ७ | नफा | ६२.१६ | ७२.१७ | +१०.०१ |
| ८ | खेळते भांडवल | ११२८९.४५ | ११६९९.०७ | +४०९.६२ |
| ९ | सी. आर. ए. आर. प्रमाण | १८.३४% | १८.३४% | ०.००% |
| १० | थकबाकी प्रमाण | ८.३१% | ८.१८% | -०.१३% |
| ११ | निव्वळ एन. पी. ए. प्रमाण | ४.९७% | १.४६% | -३.५१% |

अहवाल साल अखेर १२३२२ सभासद आहेत. अधिकृत भाग भांडवल रु. ५ कोटी असून वसूल भाग भांडवल रु.४५७.६६ लाख आहे. अधिकृत भांडवलाची मर्यादा संपुष्टात येत असलेने संचालिका मंडळाने रु. १०.०० कोटीची मर्यादा निश्चित करावी अशी उपविधी दुरुस्तीची शिफारस केलेली आहे. राखीव व इतर निधी रु.११४२.७७ लाख आहे. नेटवर्थ रु. ९९०.५६ लाख आहे. नागरी बँकांसाठी सीआरएआर किमान प्रमाण ९ % अनिवार्य आहे. आपल्या बँकेचे सीआरएआर प्रमाण १८.३४% आहे. नफाक्षमतेचा विचार करुन संस्था आणि मोठ्या रक्कमेच्या ठेवी स्विकारणेवर मर्यादा ठेवलेने ठेवीत अंशतः वाढ झाली आहे. कर्ज वितरणात समाधानकारक वाढ झालेली आहे. सरकारी रोखे, मुच्युअल फंड, ट्रेझरी बिल्स आणि सक्षम शेड्युल्ड बँकांच्या मुदत ठेवीत एकुण रु. ५०३५.१६ लाख गुंतवणूक केलेली आहे. सरकारी रोख्याचे बाजारभाव कमी झालेने खरेदी विक्री व्यवहारातून उत्पन्न मिळालेले नाही. गुंतवणूक घसारा निधी रु. १३४.११ लाखाची तरतूद केलेली आहे. ठेवी आणि कर्जात वाढ झालेने खेळत्या भांडवलात रु. ४०९.६२ लाख वाढ झालेली आहे. थकबाकीचे प्रमाण ८.१८% आहे. रिझर्व्ह बँक तपासणीअंती गतसाली निव्वळ एनपीए प्रमाण ४.९७% होते. अहवाल सालात निव्वळ एनपीए प्रमाण १.४६ % आहे. अहवाल सालात रु. ७२.१७ लाख इतका निव्वळ नफा झालेला आहे.

### नफा विभागणी :

रिझर्व्ह बँक, सहकार खाते आणि आयकर विभागाच्या मार्गदर्शक सुचनाप्रमाणे आवश्यक त्या तरतुदी करुन सन २०२२-२३ साल अखेर रु. ७२,१६,६६१.७६ इतका निव्वळ नफा झालेला आहे. संचालिका मंडळाने खालील तपशीलाप्रमाणे नफा विभागणीची शिफारस केली आहे.

| नफा | रुपये पैसे | नफा विभागणी | रुपये पैसे |
|---|---|---|---|
| चालू वर्षाचा नफा | ७२,१६,६६१.७६ | राखीव निधी २५% | १८,०४,१६५.४४ |
| | | लाभांश १० % | ४३,११,९७१.०० |
| | | गुंतवणूक चढ-उतार निधी | ११,००,५२५.३२ |
| एकूण | **७२,१६,६६१.७६** | एकूण | **७२,१६,६६१.७६** |

संचालिका मंडळाने अहवाल सालाकरिता सभासदांना प्रचलित ८% आणि सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त जादा २% अशी एकूण १०% लाभांशाची शिफारस केलेली आहे. त्यास आपण मंजुरी द्यावी अशी आपणास विनंती करते.

### ठेवी :

३१ मार्च, २०२३ अखेर एकूण रु. ९७८७.९१ लाख ठेवी आहेत. मागील वर्षाच्या तुलनेत रु. २६९.२८ लाख ठेवीत वाढ झालेली आहे. कासा ठेवीचे प्रमाण २४.३७ % आहे. व्यक्ती/संस्थाकरीता सेव्हींग, चालु, रिकरिंग, पिग्मी, मुदतबंद, पुनर्गुतवणूक दामदुप्पट, दामदिडपट अशा आकर्षक व्याजदराच्या विविध ठेव योजना आहेत. जेष्ठ नागरिकांच्या एक वर्षावरील ठेवी, एक रक्कमी रु. १५.०० लाख ठेव पावती करणारे ठेवीदार आणि संस्था ठेवींना पाव टक्के जादा व्याज दिले जाते. बँकेकडे ठेवलेल्या रु. ५ लाखापर्यंतचे ठेवीस विमा संरक्षण आहे. माहे सप्टेंबर, २०२३ अखेरचा विमा हप्ता डीआयसीजीसी कडे दिनांक ३१/०५/२०२३ रोजी भरलेला आहे. सभासद/खातेदारांनी विविध ठेव योजनांचा लाभ घ्यावा.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार सेव्हींग व चालू ठेव खातेवर नियमीत व्यवहार केले नसलेस असे खाते दोन वर्षानंतर अन-ऑपरेटिव्ह होते आणि खातेवर सलग १० वर्षे व्यवहार केले नसलेस खातेची रक्कम रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे डिफ फंडास पाठविली जाते. तेंव्हा खातेदारांनी आपल्या खात्यावर नियमित व्यवहार करावेत त्याचबरोबर आपल्या खात्याची वेळेत केवायसी/सीकेवायसी/फेरकेवायसी पुर्तता करुन द्यावी अशी विनंती करते.

**कर्जे :**

३१ मार्च, २०२३ अखेर २३६५कर्जदारांकडून रु. ५८९७.१३ लाख इतकी कर्जे येणे आहेत. अहवाल साल अखेर एकूण कर्ज वितरणापैकी ९३.१९ % अग्रक्रम क्षेत्रास आणि त्यापैकी ३६.७३% दुर्बल घटकांना कर्जे दिलेली आहेत. बँकेच्या एकूण कर्ज वितरणापैकी रु. २५ लाखावरील कर्जे ही ५०% पेक्षा कमी असावीत अशा रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचना आहेत. त्याचे पालन बँकेने केले आहे. लघु/कुटीरउद्योग आणि शेती या देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लावणाऱ्या क्षेत्रास कर्ज पुरवठा करुन देशाच्या अर्थव्यवस्थेचा समतोल विकास व्हावा याकरीता मार्च, २०२६ पर्यंत एकुण कर्जाच्या ७५%अग्रक्रम क्षेत्रास आणि १२ % दुर्बल घटकांना कर्जे देणे बंधनकारक आहे. नवीन कर्जे वितरण करीत असताना रिझर्व्ह बँकेच्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्याचे संचालिका मंडळाचे धोरण आहे. अहवाल सालात सभासदांकरीता प्रवासी वाहतूक रिक्षा खरेदी योजना सुरु केलेली होती. या योजनेस आणि इतर कर्ज योजनांना चांगला प्रतिसाद मिळालेने कर्जात वाढ झालेली आहे. यापुढेही बँकेच्या कर्ज वितरणात वाढ होईल, अशी आमची खात्री आहे.

बँकेकडे गृह कर्ज, शैक्षणिक कर्ज, व्यावसायिक कर्ज, वाहन खरेदी कर्ज,सौरउर्जा उपकरणे खरेदी कर्जे, शेती व शेतीपुरक व्यवसायाकरीता कर्जे, सोने जिन्नस, ठेवी, विमा पॉलीसी, राष्ट्रीय बचतपत्र तारण, व्यापारी आणि व्यावसायिकांसाठी तारणी/विनातारणी कॅश क्रेडीट, पगारदार नोकरासाठी विनातारणी कर्ज अशा कमीत-कमी व्याजदराच्या कर्ज सुविधा उपलब्ध आहेत. बँकेने ठरवून दिलेले निकष पुर्तता करणाऱ्या हाय. कॅश क्रेडीट खातेदारांना क्रेडीट रेटींग व्याजदर पध्दत सुरु केलेली आहे. तेव्हा सभासद व खातेदारांनी विविध कर्ज योजनांचा लाभ घ्यावा, अशी मी विनंती करते.

**थकबाकी/एन.पी.ए.:**

३१ मार्च, २०२३ अखेर ५६० थकबाकीदारांकडून रु. ४८२.२० लाख इतकी थकबाकी येणे आहे. त्यापैकी १५६ थकबाकीदारांवर लवाद दावे दाखल केले आहेत. त्यापैकी १४६ थकबाकीदारांचे रु.३१५.८६ लाख इतक्या रक्कमेचे हुकुमनामे बँकेस मिळालेले आहेत. १० थकीत कर्जदारांचे रु. १४.५९ लाख रक्कमेचे दावे मे. न्यायालयात प्रलंबीत आहेत. थकबाकीचे येणे कर्जाशी प्रमाण ८.१८ % आहे. अहवाल साल अखेर २३७ थकबाकीदारांची रु. ६३३.३७ लाख इतक्या रक्कमेची एनपीए कर्जे येणे आहेत. ढोबळ एनपीए कर्जाचे प्रमाण १०.७४ % आहे. रिझर्व्ह बँकेच्या निकषांप्रमाणे रु. ५४७.९४ लाख बुडीत कर्ज निधीची तरतुद केलेली आहे. निव्वळ एनपीए कर्जाचे प्रमाण १.४६% आहे. कोरोना आणि महापुरामुळे अद्यापही मंदीसदृश्य परिस्थिती असलेने थकबाकीदारांचा वसुलीसाठी समाधानकारक प्रतिसाद मिळत नसलेने थकबाकीचे प्रमाण वाढत आहे.

बँकेच्या काही थकबाकीदारांना थकबाकी भरणेस विनंती करुनही त्यांनी वसुलीस प्रतिसाद दिला नसलेने नाईलाजास्तव त्यांचेवर लवाद दावे आणि सिक्युरिटायझेशन कायद्या अंतर्गत कारवाई केलेली आहे. रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचने प्रमाणे कर्ज खात्यांचा थकीत कालावधी विचारात घेवून एसएमए/एनपीए वर्गिकरण दैनिक पध्दतीने होत आहे. त्या आधारे थकबाकी वसूलीची पुढील कार्यवाही केली जात आहे. थकबाकी वसूलीचे कायदेशीर कटु प्रसंग टाळणेसाठी थकबाकीदारांनी कर्जाचे हप्ते नियमीत भरावेत आणि आपले पतमुल्यांकन वाढवावे, असे मी आवाहन करते नियमीत हप्ते भरणाऱ्या कर्जदारांचे आभार मानते.

**लेखापरिक्षण व तपासणी :**

बँकेची दि. १/४/२०१८ ते ३१/३/२०२२ या चार वर्षाची रिझर्व्ह बँकेकडील वैधानिक तपासणी श्री. अनुराग भटोआ, मॅनेजर आणि श्री. प्रतिक अतरदे, सहाय्यक रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (नागरी बँक विभाग) मुंबई यांनी पूर्ण केलेली आहे. तपासणी अधिकारी यांनी बँकेचे कामकाजाबाबत समाधान व्यक्त करुन व्यवसायवाढीबाबत मार्गदर्शन केलेले आहे. तपासणी अहवाल प्राप्त झाला असून रिझर्व्ह बँकेस दोष दुरुस्ती अहवाल पाठविलेला आहे. सन २०२२-२३ चे वैधानिक लेखापरिक्षण मे. पाटील घेवडे महापूरकर ॲण्ड असोसिएट्स् चार्टर्ड अकौंटंट, कोल्हापूर यांनी पूर्ण केलेले आहे. अहवाल सालाकरिता त्यांनी बँकेस '**अ** वर्ग दिलेला आहे. समवर्ती लेखापरिक्षण मे. सुधाकर कुलकर्णी ॲण्ड कंपनी सातारा- चार्टर्ड अकौंटंट यांनी केलेले आहे. टॅक्स ऑडीट मे. दिलीप फडणीस आणि कंपनी, चार्टर्ड अकौंटंट, कोल्हापूर यांनी केलेले आहे. लेखापरिक्षकांनी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल, मी सर्वांचे आभार मानते. सन २०२३-२४ करीता वैधानिक लेखापरिक्षक म्हणून मे. पाटील घेवडे महापुरकर ॲण्ड असोसिएट्स्, चार्टर्ड अकौंटंट, कोल्हापूर यांचे फेर नेमणुकीचा प्रस्ताव रिझर्व्ह बँकेस पाठविलेला आहे.

## माहिती तंत्रज्ञान व संगणकीकरण :

आपल्या बँकेने कोअर बँकींग, रुपे डेबीट कार्ड, युपीआय, पॉज, ई. कॉमर्स, आयएमपीएस, मोबाईल बँकींग, एसएमएस, एसीएच क्लिअरींग, सिटीएस क्लिअरींग, नेफ्ट/आरटीजीएस, सीकेवायसी, आधार कार्ड संलग्न अनुदान जमा, मोबाईल ॲपव्दारे पिग्मी कलेक्शन अशा विविध डीजीटल बँकींग सेवा सुरु केलेल्या आहेत. मुख्यालयात स्वमालकीचे डेटा सेंटर उभारणी केलेली आहे. आपली बँक गुगल पे आणि भीम ॲपला लाईव्ह आहे. बँकेने क्युआर कोडकरीता पेटीएम समवेत टाय-अप केलेला आहे. मुख्यालयात स्वमालकीचे डेटा सेंटर उभारणी केलेली आहे. जनता सहकारी बँक लि. पुणे शाखा इंदापूर येथे भाडेतत्वावर डीआर साईट भाडेने घेतलेली आहे. तथापि रिझर्व्ह बँकेच्या सुचनेप्रमाणे यापुढे या बँकेस डीआर साईट सेवा देता येत नसल्याने लवकरच कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स असोसिएशन मार्फत अन्य कंपनीकडून क्लॉऊड बेस डीआरसाईट भाडेतत्वावर घेत आहोत. खातेदारांचे आर्थिक हित आणि डेटा सुरक्षित रहावा याकरीता सायबर हल्यावर नियंत्रण ठेवणारे सॉफ्टवेअर कार्यरत ठेवलेले आहे. डिजीटल चॅनल वापरताना त्यामध्ये असणाऱ्या धोक्यांचे ज्ञान ग्राहकांना व्हावे याकरीता विविध माध्यमातून सतत जनजागृती केली जाते बँकेची www.kopmahilabank या नांवे वेबसाईट सुरु केलेली आहे. विविध ठेव, कर्ज योजना आणि इतर सोयी-सुविधांची माहीती वेबसाईटवर उपलब्ध आहे. आपण डीजीटल सेवा घेत आहात यापुढेही या सेवांचा जास्तीत-जास्त लाभ घ्यावा, अशी आपणास विनंती करते.

## संचालक व समिती सभा :

अहवाल सालात संचालिका मंडळाच्या - २४, कर्ज मंजुरी उपसमिती-५, लेखापरिक्षण उपसमिती-२, थकबाकी वसुली उपसमिती -८, कर्मचारी उपसमिती -१, गुंतवणूक उपसमिती-४ ओटीएस उपसमिती-१, जिंदगी देयता उपसमिती-४ अशा एकूण ४९ संपन्न झालेल्या आहेत. संचालक मंडळ आणि समिती सभेत सर्व संचालिकांनी हजर राहुन एकमताने बँक हिताचे निर्णय घेणेत मला नेहमी सहकार्य केले आहे. संचालिका मंडळाच्या सहकार्याबद्दल मी त्यांचे आभार मानते. संचालिका मंडळास एनपीए, रिस्क मॅनेजमेंट, कार्पोरेट गव्हर्नन्स, क्रेडीट अँण्ड इनव्हेस्टमेंट मॅनेजमेंट, सायबर सिक्युरिटी मॅनेजमेंट इत्यादी विषयावर प्रशिक्षण दिलेले आहे.

## सेवक व पिग्मी एजंट :

बँकेच्या दैनंदिन कामजात आणि प्रगतीत सेवकांनी अत्यंत चांगला सहयोग दिलेला आहे. बँकेच्या प्रामाणिक व एकनिष्ठ सेवकांचे कौतुक करुन त्यांना धन्यवाद देते. नुकतीच सेवकांना पगारवाढ देवुन सुधारित वेतनकरार केलेला आहे. एप्रिल २०२३ पासून सुधारित वेतनकराराप्रमाणे मुळ वेतनवाढ, भत्ते, सोयी-सुविधा दिलेल्या आहेत, सेवक आणि त्यांचे कुटुंबियांना वैद्यकीय आणि अपघाती विम्याची सुविधा दिलेली आहे. बँकेचा सेवक प्रशिक्षित व अनुभवसिध्द व्हावा आणि राष्ट्रीयकृत/खाजगी बँकांच्या बरोबरीने त्यांनी कामकाज करावे याकरीता रिझर्व्ह बँकेकडून कॉलेज ऑफ अँग्रीकल्चल बँकींग, पुणे यांचेमार्फत सतत ऑनलाईन आणि प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जात आहे. तसेच इतर मान्यताप्राप्त संस्थाकडून सेवकांना डिजीटल बँकींग, सायबर सिक्युरिटी आणि इतर विविध विषयाचे सतत प्रशिक्षण दिलेले आहे. बँक असोसिएशन कोल्हापूर यांनी आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमात नवीन भरती केलेले प्रशिक्षणार्थी लिपीक प्रशिक्षण घेत आहेत. तसेच दैनंदिन कामकाजावर आधारित बँके अंतर्गत नियमीत प्रशिक्षणाची सोय उपलब्ध केलेली आहे. अहवाल सालात बँकेचे लिपीक सेवक श्री. इंद्रजीत श्रीपतराव पाटील हे सेवानिवृत झालेले आहेत.

## शैक्षणिक व सामाजिक कार्य:

बँकेचे सभासद व त्यांचे जवळचे नातेवाईक यांच्या गंभीर आजाराचे उपचारासाठी आणि शस्त्रक्रियेसाठी बँकेमार्फत आर्थिक मदत दिली जाते. जे सभासद एका मुलीनंतर कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करतील त्यांना प्रोत्साहनपर बक्षीस देणेची योजना आहे. सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा प्रशस्तीपत्र व रोख रक्कम देवून गौरव केला जातो.सभासदांच्या ज्या पाल्यांनी १० वी आणि १२ वी च्या परिक्षेत ७० टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळवलेले आहेत. त्यांना रोख बक्षीस व प्रशस्तीपत्र दिले जाते.

**संकल्प व समारोप :**

रिझर्व्ह बँकेच्या अभ्यास गटाने देशातील नागरी सहकारी बँकांसमोरील विविध समस्या सोडविणे आणि त्यांना मार्गदर्शन करणेकरीता केंद्रीय पातळीवर एखादी संस्था असावी, अशी शिफारस केलेली होती. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने दिनांक ६ जून २०१९ रोजीच्या पत्रान्वये नागरी बँकासाठी अम्ब्रेला ऑर्गनायझेशनच्या स्थापनेस मंजुरी देवुन या संस्थेचे नॅशनल को. ऑप. फायनान्स अँण्ड डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि. असे नामांकन केलेले आहे. अम्ब्रेला ऑर्गनायझेशनने नागरी बँकांचे पालकत्व स्विकारलेने यापुढील काळात बँकांच्या प्रगतीत या केंद्रीय संस्थेचा हातभार लागणार आहे.

आपल्या बँकेच्या शाखा हुपरीकडे पट्टणकोडोली या गावातील बहुतांशी शेती, व्यापार, उद्योग आणि व्यवसाय करणारे आणि जवळच्या औद्योगिक वसाहतीमधील कारखानदार सभासद आणि खातेदार आहेत. या सभासद खातेदारांच्या व्यवहाराची सोय आणि व्यवसायवृध्दी व्हावी याकरिता शाखा हुपरी कार्यालय पट्टणकोडोली ता. हातकणंगले या गावात स्थलांतरित करणेचा प्रस्ताव रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे पाठविलेला आहे, त्यास मंजुरी मिळालेनंतर शाखा हुपरी कार्यालय पट्टणकोडोली येथे स्थलांतरीत करीत आहोत. तसेच रिझर्व्ह बँकेचे नवीन शाखाविस्तार करणेस परवानगी देणेचे धोरण असलेने नवीन शाखा उघडणेचा संचालिका मंडळाचा मनोदय आहे.

बँकेच्या ग्राहकांकडून चांगल्या सेवेच्या अपेक्षा वाढलेल्या असलेने सध्याचा ग्राहक टिकवून ठेवणे आणि तरुण पिढीचा नवीन ग्राहक आकर्षित करणेसाठी शाखा आणि मुख्य कार्यालयाचा अंतर्गत व बाह्य परिसर सुशोभित करुन प्रसन्न वातावरणात ग्राहक सेवा देणे क्रमप्राप्त झालेले आहे. तेव्हा शाखा व मुख्यालय इमारतीची अंतर्गत सजावट, एकसमान रंगकाम, नांवाचे बोर्ड आणि फर्निचर इत्यादींचा समावेश करुन बँकेची विशेष आणि आदर्श ओळख करुन देणेची संचालिका मंडळाची संकल्पना आहे. त्यातून बँकेची व्यवसायवृध्दी निश्चितच होईल अशी आमची खात्री आहे बँकेच्या प्रगतीत आणि व्यवसायवृध्दीत आपण सर्व सभासद, ठेवीदार, खातेदार, ग्राहक आणि हितचिंतक नेहमी सहयोग देत आहात. यापुढेही आपले सहकार्य मिळावे. अशी अपेक्षा करते आणि आपणास धन्यवाद देते.

**आभार :**

रिझर्व्ह बँकेचे अधिकारी, महाराष्ट्र राज्याचे मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, पुणे, मा. विभागीय सहनिबंधक, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, कोल्हापूर, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, आयडीबीआय बँक, एचडीएफसी बँक आणि इतर बँका, सहकारी संस्था, नँशनल फेडरेशन. राज्यस्तरीय फेडरेशन, बँक असोसिएशन यांचे पदाधिकारी/ अधिकारी, बँकेचे सल्लागार आणि मुल्यांकनदार यांनी बँकेस मोलाचे सहकार्य दिलेले आहे. अहवाल सालात विविध शासकीय, निम-शासकीय अधिकारी, मान्यवर व्यक्ती, सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक, हितचिंतक यांनी भेटी देवून व्यवहारात सहयोग दिलेला आहे, या सर्वांची मी आभारी आहे.

आपल्या बँकेचे सन २०२२-२०२३ अहवाल सालचे प्रतिवृत, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, नफा विभागणी, पुढील वर्षाचे खर्चाचे अंदाजपत्रक, उपविधी दुरुस्ती, लेखापरिक्षकांचा अहवाल आणि सन २०२३-२४ करीता वैधानिक लेखापरिक्षक नेमणुक इत्यादी विषय आपणा समोर सादर केले आहेत. त्यास आपण मंजुरी द्यावी अशी संचालिका मंडळाचेवतीने मी आपणास विनंती करते.

संचालिका मंडळाचे वतीने
आपली विनीत,

-जय सहकार-

(सौ. शैलजा उदय सुर्यवंशी)
अध्यक्षा

स्थळ : कोल्हापूर
दि. ११/०८/२०२३

## सभासदांना विशेष विनंती

१) पोटनियमाप्रमाणे सभासदांची क्रियाशील व अक्रियाशील सभासद अशी विभागणी केली जाते. तेव्हा सभासदांनी किमान रुपये १००० चे शेअर्स धारण करावेत, किमान रुपये १०,००० ठेव ठेवावी किंवा रुपये २५,००० कर्ज घ्यावे. पाच वर्षामध्ये किमान एका वार्षिक सभेस उपस्थित रहावे.
२) सभासदांनी आपल्या पत्त्यातील अगर अन्य बदलाची नोंद त्वरीत बँकेकडे द्यावी.
३) आपला वारस नेमला नसेल तर वारस नेमण्याची कार्यवाही बँकेत येऊन विनाविलंब करुन घ्यावी.
४) सेव्हिंग व चालू खातेदारांनी केवायसी कागदपत्रांची अद्यावत पूर्तता करावी.
५) ओळखपत्रासाठी आयडेंटीटी कार्ड साईज दोन फोटो देऊन ओळखपत्र तयार करुन घ्यावे.
६) बँक ठेव विमा महामंडळाच्या नियमानुसार आपल्या बँकेतील रु. ५,००,०००/- पर्यंतच्या ठेवींना विमा संरक्षण आहे.
७) मार्च-एप्रिल २०२३ मध्ये इ.१० वी-१२ वी परिक्षेत ७०% पेक्षा जास्त गुणाने उत्तीर्ण झालेल्या सभासदांच्या पाल्यानी ०७ सप्टेंबर २०२३ पर्यंत अर्ज व गुणपत्रक बँकेत सादर करावे.

### गुंतवणूक/समवर्ती लेखापरिक्षक

मे. सुधाकर कुलकर्णी अँण्ड कंपनी
चार्टर्ड अकौटंट

### टॅक्स कन्स्लटंट

मे. दिलीप फडणीस ॲण्ड कंपनी
चार्टर्ड अकौटंट

### कायदा सल्लागार

ॲड. के. ए. कापसे
ॲड. के. एस. पाटील
ॲड. अंकुश भांदिगरे
ॲड. एल. एस. शहा
ॲड. एन. एम. साळोखे
ॲड. प्रताप बी. जाधव

### मुल्यांकनदार

श्री. ए. व्ही. कदम
श्री. आर. व्ही. फडणीस
श्री. एस. बी. अथणे
श्री. सी.डी. हराळे
श्री. प्रदिप व्ही. कुलकर्णी
श्री. रविराज एस. तांबट

### सराफ

श्री. सतिश तक्षक पोतदार श्री. व्ही. ए. भुर्के श्री. मकरंद चंद्रकांत पोतदार

### बँकर्स

* भारतीय स्टेट बँक, कोल्हापूर
* महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., मुंबई
* कोल्हापूर जिल्हा मध्य. सह. बँक लि., कोल्हापूर
* एच. डी. एफ. सी. बँक, कोल्हापूर
* आय. डी. बी. आय. बँक, कोल्हापूर

कोल्हापूर महिला सहकारी बँक लि., कोल्हापूर
संचालिका मंडळ सभा दिनांक ११/०८/२०२३ ठराव क्रमांक १६ ने उपविधीत सुचविलेली दुरुस्ती

| उपविधी क्र. | सध्याच्या उपविधीची शब्द योजना | उपविधी क्र. | दुरुस्ती उपविधीची शब्द योजना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|---|
| ८ | भाग भांडवलः-<br>बँकेचे अधिकृत भाग भांडवल रु. ५,००,००,०००/- (रु. पाच कोटी मात्र)इतके असून ते रु. १०००/- दर्शनी किंमतीच्या ५०००० इतक्या भागात विभागलेले असेल. | ८ | भाग भांडवलः-<br>बँकेचे अधिकृत भाग भांडवल रु. १०,००,००,०००/-(रु. दहा कोटी मात्र) इतके असून ते रु. १०००/- दर्शनी किंमतीच्या १००००० इतक्या भागात विभागलेले असेल. | भाग भांडवल मर्यादा संपुष्टात येत असलेने |

## BALANCE SHEET AS ON 31.03.2023

(Rs. In Lakhs)

| CAPITAL & LIABILITIES | भांडवल व देणी | SCHEDULE NO. | AS ON 31.03.2023 | AS ON 31.03.2022 |
|---|---|---|---|---|
| Capital | खपलेले भाग भांडवल | 1 | 457.66 | 418.69 |
| Reserve Fund and Surplus | गंगाजळी व नफा | 2 | 1214.94 | 1106.43 |
| Deposits | ठेवी | 3 | 9787.91 | 9518.63 |
| Borrowings | घेतलेली कर्जे | 4 | 0.00 | 0.00 |
| Other | इतर देणी व तरतूदी | 5 | 711.71 | 687.67 |
| | **Total** | | **12172.22** | **11731.42** |
| **ASSETS** | **जिंदगी** | **SCHEDULE NO.** | **AS ON 31.03.2023** | **AS ON 31.03.2022** |
| Cash and Balances with RBI | रोख व आरबीआय कडील शिल्लक | 6 | 80.03 | 190.96 |
| Balances with Banks and Money at Call & Short Notices | इतर बँकातील शिल्लक व कॉल मनी नोटीस | 7 | 1526.23 | 1730.07 |
| Investments | गुंतवणूक | 8 | 3890.16 | 3890.77 |
| Advances | कर्जे | 9 | 5897.13 | 5164.96 |
| Fixed Assets | इमारत जागा व डेड स्टॉक | 10 | 80.71 | 86.10 |
| Other Assets | इतर येणी | 11 | 697.96 | 668.56 |
| | **Total** | | **12172.22** | **11731.42** |
| Contigent Liabilities | संभाव्य देणी व जबाबदाऱ्या | 12 | 13.93 | 33.41 |

## PROFIT AND LOSS ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31.03.2023

(Rs. In Lakhs)

| PARTICULARS | तपशील | SCHEDULE NO. | FOR THE YEAR ENDED 31.03.2023 | FOR THE YEAR ENDED 31.03.2022 |
|---|---|---|---|---|
| Income | उत्पन्न | | | |
| Interest Earned | व्याज जमा व कसर | 13 | 942.66 | 936.63 |
| Other | इतर | 14 | 39.70 | 56.76 |
| | **Total** | | **982.36** | **993.39** |
| Expendiures | खर्च | | | |
| Interest Expended | ठेवी व कर्जावरील व्याज | 15 | 520.29 | 575.39 |
| Operating Expenses | प्रशासकीय खर्च | 16 | 284.04 | 263.44 |
| Provisions and Contingencies | तरतूदी | 17 | 105.86 | 92.40 |
| | **Total** | | **910.19** | **931.23** |
| Net Profit of the year | वर्षा अखेरचा निव्वळ नफा | | 72.17 | 62.16 |
| | **Total** | | **982.36** | **993.39** |
| Appropriations | - | | - | - |
| Balance Profit of Last year | मागील वर्षाचा शिल्लक नफा | | 0.00 | 0.00 |
| Current Year Profit | वर्ष अखेरचा निव्वळ नफा | | 72.17 | 62.16 |
| Total Profit for Appropriation | एकूण नफा | | | |
| | **Total** | | **72.17** | **62.16** |
| Appropriations | नफा विभागणी | | - | - |
| Transfer to Statutory Reserves | २५ टक्के रिझर्व्ह फंड | | 18.04 | 15.53 |
| Transfer to Divident | १० टक्के डिव्हीडंड (८%) | | 43.12 | 33.50 |
| Transfer to Computer fund | संगणक निधी | | 0.00 | 5.00 |
| Transfer to Contingent fund | कॉन्टीजन्सी फंड | | 0.00 | 3.00 |
| Transfer to Sepcial Reserver Fund | स्पेशल रिझर्व्ह फंड | | 0.00 | 4.00 |
| Transfer to Member welfare fund | सभासद कल्याण निधी | | 0.00 | 0.45 |
| Transfer to staff welfare fund | सेवक कल्याण निधी | | 0.00 | 0.45 |
| Transfer to charity fund | धर्मादाय निधी | | 0.00 | 0.23 |
| Investment Flucation fund | गुंतवणूक चढ-उतार निधी | | 11.01 | 0.00 |
| | **Total** | | **72.17** | **62.16** |

# Schedules to the Financial Statements

(Rs. In Lakhs)

## SCHEDULES -1 CAPITAL

| Schedules - 1 Capital | 31.03.2023 | 31.03.2022 |
|---|---|---|
| Particulars | Amount | Amount |
| Authorised Share Capital (5,00,00,000/- "A" Class shares of Rs. 1000/- each)Issued & paid Up | | |
| Share Rs. 1000/- each fully paid up | | |
| 1) Individual | 457.66 | 418.69 |
| 2) Co-op Institutions / State Govt. | 0.00 | 0.00 |
| 3) Other | 0.00 | 0.00 |
| Total | 457.66 | 418.69 |

**Schedules - 2 Reserve And Surplus**

| Particulars | Amount | Amount |
|---|---|---|
| **1 Statutory Reserve** | 306.76 | 283.85 |
| Opening Balance | 283.85 | 264.47 |
| Additions during the year | 22.91 | 19.38 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **2 Building Fund** | **80.06** | **80.06** |
| Opening Balance | 80.06 | 80.06 |
| Additions during the year | 0.00 | 0.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **3 Dividend Equalization fund** | 3.09 | 3.09 |
| Opening Balance | 3.09 | 1.79 |
| Additions during the year | 0.00 | 1.30 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **4 Bad and Doubtful Debts Reserve** | **537.94** | **502.94** |
| Opening Balance | 502.94 | 470.94 |
| Additions during the year | 35.00 | 32.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **5 Investment Fluctuation Reserve** | **3.00** | **3.00** |
| Opening Balance | 3.00 | 3.00 |
| Additions during the year | 0.00 | 0.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **6 Resolution Framework 2.0** | **0.00** | **0.00** |
| Opening Balance | 0.00 | 0.00 |
| Additions during the year | 0.00 | 0.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **7 Special Reserve U/s 63(c)of MSCS act 2002** | **17.00** | **13.00** |
| Opening Balance | 13.00 | 13.00 |
| Additions during the year | 4.00 | 0.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **8 Charity Fund** | **0.78** | **0.56** |
| Opening Balance | 0.56 | 0.56 |
| Additions during the year | 0.22 | 0.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **9 Contingency Fund** | **23.00** | **20.00** |
| Opening Balance | 20.00 | 25.00 |
| Additions during the year | 3.00 | 12.00 |
| Deductions during the year | 0.00 | 17.00 |

| Particulars | Amount | Amount |
|---|---|---|
| **10 Provision for Slandered asstes** | **18.00** | **18.00** |
| Opening Balance | 18.00 | 18.00 |
| Additions during the year | 0.00 | 0.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **11 Staff Welfare fund** | **1.65** | **1.23** |
| Opening Balance | 1.23 | 1.27 |
| Additions during the year | 0.00 | 0.00 |
| Deductions during the year | 0.42 | 0.04 |
| **12 Investment Depreciation Reserve** | **134.11** | **106.61** |
| Opening Balance | 106.61 | 72.21 |
| Additions during the year | 27.50 | 34.40 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **13 Standard Covid-19 Reserve** | **10.00** | **10.00** |
| Opening Balance | 10.00 | 10.00 |
| Additions during the year | 0.00 | 0.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **14 Member welfare fund** | **2.37** | **1.93** |
| Opening Balance | 1.92 | 1.96 |
| Additions during the year | 046 | 0.00 |
| Deductions during the year | 0.01 | 0.04 |
| **15 Computer Fund** | **5.00** | **0.00** |
| Opening Balance | 0.00 | 0.00 |
| Additions during the year | 5.00 | 0.00 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **16 Balance in profit and Loss** | **72.17** | **62.16** |
| Opening Balance | 0.00 | 0.00 |
| Additions during the year | 72.17 | 62.16 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **Total** | **1214.94** | **1106.43** |

# Schedules to the Financial Statements

(Rs. In Lakhs)

## SCHEDULES -3 DEPOSITS

| Particulars | Amount | Amount |
|---|---|---|
| A.1 Demand Deposits | 542.94 | 344.25 |
| (I) From Bank | 0.00 | 0.00 |
| (II) From Others | 542.94 | 344.25 |
| 2. Savings Bank Deposits | 1842.45 | 1799.15 |
| 3. Term Deposits | 7402.52 | 7375.23 |
| (I) From Bank | 0.00 | 0.00 |
| (II) From Others | 7402.52 | 7375.23 |
| **Total (1+2+3)** | **9787.91** | **9518.63** |
| **B.(I) Deposits of branches in India** | **9787.91** | **9518.63** |
| **(II) Deposits of branches outside india** | 0.00 | 0.00 |
| Total (I+II) | **9787.91** | **9518.63** |

## Schedules - 4 Borrowings

| Particulars | Amount | Amount |
|---|---|---|
| I. Borrowing in india | 0.00 | 0.00 |
| (I) Reserve Bank of India (LAF) | 0.00 | 0.00 |
| (ii) Other banks | 0.00 | 0.00 |
| (iii) Other institutions and agencies | 0.00 | 0.00 |
| (iv) Other long Term (Subordinated deposits (LDT) | 0.00 | 0.00 |
| II. Borrowings Outside india | 0.00 | 0.00 |
| Total (I&II) | 0.00 | 0.00 |

Secured borrowings included I and II Above Rs Lacs (Last year Rs Lacs)

## Schedules - 5 Other Laibilities and Provisions

| Particulars | Amount | Amount |
|---|---|---|
| I. Bills payable | 7.94 | 16.67 |
| II. Inter-office adjustments (Net) | 0.00 | 0.00 |
| III. Interests accrued | 603.86 | 601.71 |
| IV Others (including Provisions) | 99.91 | 69.29 |
| **Total** | **711.71** | **687.67** |

## Schedules - 6 Cash And Balances With Reserve Bank of

| Particulars | Amount | Amount |
|---|---|---|
| I. Cash in hand (Including foreign | 80.03 | 190.96 |
| Currency notes) | 0.00 | 0.00 |
| II Balance with Reserve Bank of India | 0.00 | 0.00 |
| (I in Current Account | 0.00 | 0.00 |
| (ii) in other Account | 0.00 | 0.00 |
| Total (I&II) | **80.03** | **190.96** |

## Schedules - 7 Balance With Banks And Money At Call Short Notices

| Particulars | Amount | Amount |
|---|---|---|
| I. In India | 1526.23 | 1730.07 |
| I. Balances with banks | 1526.23 | 1730.07 |
| a. In Current Accounts | 381.23 | 325.07 |
| b. In Other Deposit Accounts | 1145.00 | 1405.00 |
| II. Money at call and short notice | 0.00 | 0.00 |
| a. With banks | 0.00 | 0.00 |
| b. With other institutions (RBI LAF) | 0.00 | 0.00 |
| **Total (i&ii)** | **1526.23** | **1730.07** |
| II. Outside Accounts | 0.00 | 0.00 |
| I . in Current Accounts | 0.00 | 0.00 |
| I. In Other Deposit Accounts | 0.00 | 0.00 |
| II. Money at call and short notice | 0.00 | 0.00 |
| **Total (i&ii) Grand Total** | **1526.23** | **1730.07** |

## Schedules - 8 Investment

| Particulars | Amount | Amount |
|---|---|---|
| I Investment in india in | 3890.16 | 3890.77 |
| I Government Securities | 3882.16 | 3882.77 |
| ii. Other approved securities | 0.00 | 0.00 |
| iii. Shares | 8.00 | 8.00 |
| iv. Debentures and Bonds | 0.00 | 0.00 |
| v. Subsidiaries and / or Joint Ventures | 0.00 | 0.00 |
| vi. Others (SRs issued by ARCs) | 0.00 | 0.00 |
| **Total** | **3890.16** | **3890.77** |
| ii. Investment outside in India in | 0.00 | 0.00 |
| I Government Securities (including | 0.00 | 0.00 |
| Local authorities | 0.00 | 0.00 |
| ii Subsidiaries and / or Joint Ventures | 0.00 | 0.00 |
| iii. Other Investments (to be specified) | 0.00 | 0.00 |
| Total | 0.00 | 0.00 |
| **Grand Total (I&II)** | **3890.16** | **3890.77** |

## Schedules - 9 Advances

| Particulars | Amount | Amount |
|---|---|---|
| A I Bills purchased and discounted | 0.00 | 0.00 |
| ii) Cash credits, overdrafts and loans | 0.00 | 0.00 |
| repayable Guarantees | 1703.90 | 1675.46 |
| iii) Term Loans | 4193.23 | 3489.50 |
| **Total** | **5897.13** | **5164.96** |
| B. I Secured by tangible assets | 0.00 | 0.00 |
| ii) Covered by Bank / Government Guarantees | 0.00 | 0.00 |
| iii) Unsecured | 705.97 | 554.80 |
| Total | 705.97 | 554.80 |
| C.i. Advances in india | 5897.13 | 5164.96 |
| I priority Sectores | 4811.98 | 3377.59 |
| ii Public Sector | 0.00 | 0.00 |
| iii Banks | 0.00 | 0.00 |
| iv Others | 1085.15 | 1787.37 |
| C.ii Advances Outside India | 0.00 | 0.00 |
| I Due form Banks | 0.00 | 0.00 |
| ii) Due form Other | 0.00 | 0.00 |
| a) bills purchased and discounted | 0.00 | 0.00 |
| b) syndicated loans | 0.00 | 0.00 |
| c) Others | 0.00 | 0.00 |
| **Total** | **5897.13** | **5164.96** |
| **Grand Total (C.I.&C.II)** | **5897.13** | **5164.96** |

## Schedules - 10 Fixed Assets

| Particulars | Amount | Amount |
|---|---|---|
| A Premises (including land) | 0.00 | 0.00 |
| Gross Block | 0.00 | 0.00 |
| At cost on 31 st march of the preceding year | 50.04 | 51.32 |
| Additions during the year | 0.00 | 0.00 |

# Schedules to the Financial Statements

(Rs. In Lakhs)

| | | |
|---|---|---|
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **Total** | **50.04** | **51.32** |
| Depreciation | 0.00 | 0.00 |
| As at 31 st March of the preceding | 0.00 | 0.00 |
| year | 0.00 | 0.00 |
| Charge for the year | 0.00 | 0.00 |
| on deductions during the year | 1.25 | 1.28 |
| **Total** | **1.25** | **1.28** |
| Net block (A) | 48.79 | 50.04 |
| B. Other Fixed Assets | 0.00 | 0.00 |
| (including furniture and Fixtures) | 0.00 | 0.00 |
| Gross Block | 0.00 | 0.00 |
| At cost on 31 st march of the preceding year | 36.06 | 37.72 |
| Additions during the year | 9.36 | 11.24 |
| Deductions during the year | 0.00 | 0.00 |
| **Total** | **45.42** | **48.96** |
| Decrepitation | | |
| As at 31 st March of the preceding year | 13.50 | 12.90 |
| Charge for the year | | |
| on deductions during the year<br>Total | 13.50 | 12.90 |
| Net block (B) | 31.92 | 36.06 |
| C. Net block (C=A+B) | 80.71 | 86.10 |

## Schedules - 11 Other Assets

| Particulars | | |
|---|---|---|
| I Inter-office adjustment (net) | 0.00 | 0.00 |
| ii. Interest accrued | 621.70 | 588.03 |
| iii. Tax paid in advance / tax deducted at source (TDS) | 46.02 | 58.77 |
| iv. Stationery and Stamps | 0.00 | 0.00 |
| v. Non banking assets acquired in satisfaction of clalms | 0.00 | 0.00 |
| vi. Others | 30.24 | 21.76 |
| **Total** | **697.96** | **668.56** |

## Schedules - 12 Contingent Liabilities

| Particulars | | |
|---|---|---|
| I. Clalms against the bank not | 0.00 | 0.00 |
| acknowled as debts | | |
| II. Liability for partly paid investments | 0.00 | 0.00 |
| III. Liability on account of out standing forward exchange contracts | 0.00 | 0.00 |
| iv. Guarantees given on behalf of constituents | 0.00 | 20.00 |
| a) In India | 0.00 | 20.00 |
| b) outside India | 0.00 | 0.00 |
| V. Acceptances, endorsements and | 0.00 | 0.00 |
| other obligations<br>Vi. Other items for which the bank is | 0.00 | 0.00 |
| contingently liable(DEAF) | 13.93 | 13.41 |
| **Total** | **13.93** | **33.41** |

## Schedules - 13 Interest Earned

| Particulars | Amount | Amount |
|---|---|---|
| I Interest / discount on advance / bills | 628.30 | 629.18 |
| ii. Income on investments | 314.36 | 307.45 |
| iii. interest on balance with Reserve Bank of India and other inter-bank funds | 0.00 | 0.00 |
| iv. Others | 0.00 | 0.00 |
| **Total** | **942.66** | **936.63** |

## Schedules - 14 Other Income

| Particulars | Amount | Amount |
|---|---|---|
| I. Commission, exchange and brokerage | 0.87 | 0.45 |
| ii. Profit on sale of investments Less : Loss on sale of investments | 0.00 | 10.24 |
| iii Profit on revaluation of investments | 0.00 | 0.00 |
| iv. Profit on sale of land buildings and other assets Less : Loss on sale of land building and other assets | 0.01 | 0.34 |
| v. Profit on exchange transactions | 0.00 | 0.00 |
| Less : Loss on exchange transactions<br>vi. Income earned by way of devidends etc. from subsidiaries /companies / in india | 0.80 | 0.80 |
| vii NPA Provision written Back | 0.00 | 0.00 |
| viii Deffered Tax Assets (DTA) | 0.00 | 0.00 |
| ix. Miscellaneous Income | 38.02 | 44.93 |
| **Total** | **39.70** | **56.76** |

Note : Under items II to V loss figures may be shown in brackets.

## Schedules - 15 Interest Expended

| Particulars | Amount | Amount |
|---|---|---|
| I. Interest on deposits | 515.78 | 575.19 |
| ii. Interest on Reserve Bank of India/ Inter bank borrowings | 0.00 | 0.00 |
| iii. Others | 4.51 | 0.20 |
| **Total** | **520.29** | **575.39** |

## Schedules - 16 Operating Expenses

| Particulars | Amount | Amount |
|---|---|---|
| I Payments to and provisions for exployees | 145.19 | 146.16 |
| ii. Rent, taxes and lighting | 23.40 | 24.57 |
| iii. Printing and Stationery | 0.53 | 0.41 |
| iv. Advertisement and publicity | 0.93 | 0.41 |
| vi. Depreciation on bank's property | 13.50 | 13.15 |
| v. Director's fees, allowances and expenses | 1.85 | 1.67 |
| vi. Auditors fees and expenses ( including branch auditors | 9.32 | 6.00 |
| vii. Law charges | 0.18 | 0.12 |
| ix. postages Telegrams & Telephons ect | 3.12 | 2.43 |
| x. Repairs and maintenance | 1.65 | 1.24 |
| xi. Insurance | 22.82 | 17.78 |
| xii. Other expenditure | 61.55 | 49.50 |
| xiii. Loss on NON SLR Bonds | 0.00 | 0.00 |
| **Total** | **284.04** | **263.44** |

# Schedules to the Financial Statements

(Rs. In Lakhs)

| Schedules - 17 Provisions And Contingencies | | |
|---|---|---|
| Particulars | Amount | Amount |
| I Band Doutful Debts Reserve (BDDR) Provision | 35.00 | 32.00 |
| ii. Provision against Standard Assets | 0.00 | 0.00 |
| iii.Provision for Standard Account (COVID-19) | 0.00 | 0.00 |
| iv. Provision for Resolution Framework | 0.00 | 0.00 |
| v.Provision for Restrutured for Advances (COVID-19 | 0.00 | 0.00 |
| vi. Investment Depredation Reserve Provision | 28.11 | 35.40 |
| Vii Provision for Income Tax | 42.75 | 25.00 |
| Viii Short Provision for Income Tax FY 2022-23 | 0.00 | 0.00 |
| ix. Special Reserve Under Income Tax | 0.00 | 0.00 |
| x. Provision for Non-Performing Investment | 0.00 | 0.00 |
| xi. Provision for ARC Security Receipts | 0.00 | 0.00 |
| **Total** | **105.86** | **92.40** |

Sou. S. U. Suryavanshi
Chairman

Smt. M. V. Shinde
Vice- Chairman

Shri. J. K. Kumbhar
General Manager

Shri. N. P. Patil
Manager

Shri. N. V. Kadam
Accountant

M/s Patil Ghevade Mahapurkar & Associate
Chartered Accountant
FRN - 126000 W
UDIN 23118103BGWHNE2090

**Board of Directors**

Sou. M. S. Damame
Sou. S. B. Dongale
Smt. J. R. Nimbalkar
Smt. T. M. Bhosale
Smt. B. B. Dongale
Sou. S. P. Indulkar
Sou. S. P. Patil (Koulavkar)
Sou. Shubhangi Sushindran (Bhosale)
Sou. M. J. Ghotane
Smt. M. N. Sutar
Smt. J. A. Parmale
Sou. V. B. Jadhav
Sou. P. M. Dharamadhikari

**आमच्या बँकेच्या**
**बिंदू चौक, राजारामपुरी, गांधीनगर, खासबाग व शाहूपुरी या शाखांकडे लॉकर्स उपलब्ध आहेत.**

## सन २०२३-२०२४ करीता खर्चाचे अंदाजपत्रक

| अ.नं. | खर्च तपशील | सन २२-२३ मंजूर बजेट | सन २०२२-२३ चा प्रत्यक्ष खर्च | सन २०२३-२४ करीता सूचविलेले बजेट |
|---|---|---|---|---|
| १ | सेवक पगार भत्ते बोनस भ. नि. | १९०००००.०० | १४५१९१६९.०० | १९०००००.०० |
| २ | संचालक मंडळ मिटींग भत्ता | २५००००.०० | १८५१८०.०० | ३५००००.०० |
| ३ | भाडे, कर व दिवाबत्ती | ४५०००००.०० | ४६२१९४८.४६ | ५००००००.०० |
| ४ | टपाल तार व दूरध्वनी | ३२५०००.०० | ३११७२५.७१ | ३५००००.०० |
| ५ | स्टेशनरी छपाई व जाहिरात | १५००००.०० | १४५६०९.८१ | १५००००.०० |
| ६ | हिशोबतपासणी फी | ७७५०००.०० | ९३२५००.०० | ९५००००.०० |
| ७ | झीज व दुरुस्ती | २००००००.०० | १५१५०३१.७८ | २००००००.०० |
| ८ | शुभलक्ष्मी कमीशन | १५०००००.०० | १६६६८५३.४९ | १७०००००.०० |
| ९ | किरकोळ खर्च व आदर सत्कार | २०००००.०० | २१२४७३.०० | २५००००.०० |
| १० | वार्षिक सभा खर्च | १५००००.०० | ९७३७६.४० | १५००००.०० |
| ११ | शिपाई ड्रेस | २५०००.०० | ७६१९.०४ | २५०००.०० |
| १२ | प्रवास खर्च | १०००००.०० | ९९९४.०० | १०००००.०० |
| १३ | टंकलेखन खर्च | ५००००.०० | ५२२२८.०० | ५५०००.०० |
| १४ | वृतपत्र वर्गणी खर्च | २५०००.०० | २४७४५.०० | २५०००.०० |
| १५ | इतर खर्च | २५००००.०० | ६१०५६८.३८ | ३०००००.०० |
| १६ | बँक फेड/असो. वर्गणी | ७५०००.०० | ३५०००.०० | ७५०००.०० |
| १७ | कायद्याबाबतचा खर्च | १०००००.०० | १७९६७.०० | ५००००.०० |
| १८ | पुस्तक खरेदी व ग्रंथालय | २५००.०० | ०.०० | २५००.०० |
| १९ | सेवक/संचालिका प्रशिक्षण खर्च | ७५०००.०० | १४३७४८.८६ | ३०००००.०० |
| २० | भ.नि.नि./विमा/सेवाशुल्क | १५००००.०० | ९३८४८.०० | १५००००.०० |
| २१ | संगणक खर्च | २००००००.०० | २०४३०६५.४६ | ३००००००.०० |
| २२ | पाणी बील | ३००००.०० | ३२८०२.६० | ३५०००.०० |
| २३ | पोष्ट बॉक्स भाडे | ५००.०० | ३००.०० | ५००.०० |
| २४ | लेबर वेलफेअर फंड | ५०००.०० | १२९६.०० | ५०००.०० |
| २५ | वाहन दुरुस्ती | २५०००.०० | ३८९०९.६२ | ४००००.०० |
| २६ | शॉप अँक्ट लायसन फी | १००००.०० | ०.०० | १००००.०० |
| २७ | सभासमारंभ | ५००००.०० | १५०९०.०० | ५००००.०० |
| २८ | वसुली खर्च | २५०००.०० | ४०७३.९६ | २५०००.०० |
| २९ | राईट ऑफ | ५००००.०० | ०.०० | ५००००.०० |
| ३० | सेवाकर/जीएसटी | ५०००००.०० | ३७५१६८.४१ | ५०००००.०० |
| ३१ | वकील फी | २००००.०० | ०.०० | २००००.०० |
| ३२ | पेट्रोल/डिझेल खर्च | २०००००.०० | १७६४९१.०० | २०००००.०० |
| ३३ | एंटरचेंज फी | ७०००००.०० | ५१३००१.९६ | ७०००००.०० |
| ३४ | निवडणूक खर्च | २५००००.०० | ०.०० | ०.०० |
| ३५ | मुख्यमंत्री सहाय्यता निधी | ५१०००.०० | ०.०० | ५१०००.०० |
| ३६ | क्लिअरींग चार्जीस | ०.०० | २८४.४० | १००००.०० |
| | एकूण | ३३६१९०००.०० | २८४०४०६९.३४ | ३५६७९०००.०० |

## शासकीय लेखापरिक्षकांचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी कायद्याच्या कलम ८१ (५) (ब) व नियम ६९ नुसार )

आम्ही सोबत जोडलेल्या कोल्हापूर महिला सहकारी बँक लि. कोल्हापूर या बँकेच्या ३१ मार्च २०२३ अखेरचा एकत्रीत ताळेबंद(प्रधान कार्यालय व सात शाखा) व त्या दिवशी संपणाऱ्या आर्थिक वर्षाचे एकत्रीत नफातोटापत्रकाचे लेखापरिक्षण केलेले आहे. सदरची आर्थिक पत्रके ही बँकेच्या व्यवस्थापनाने बनविलेली असून ती त्यांची जबाबदारी आहे. सदर आर्थिक लेखापरिक्षणावरुन त्यावर अभिप्राय व्यक्त करणे इतकीच आमची जबाबदारी आहे.

भारतामध्ये प्रचलीत असलेल्या लेखापरिक्षणाच्या मानदंडपद्धतीनुसार (Standard) आम्ही संस्थेचे लेखापरिक्षण केले आहे. सदरच्या आदर्श पद्धतीनुसार, संस्थेच्या आर्थिक पत्रकामध्ये कोणतेही मोठे/महत्वाचे (Material) चुकीचे विधान नाही याची रास्त खात्री करण्याच्या दृष्टीने लेखापरिक्षणाचा आराखडा करणे व लेखापरिक्षण करणे जरुरीचे असते. लेखापरिक्षणात नमुना परिक्षण पध्दतीने (Test Check) आर्थिक पत्रकातील रक्कमा व त्याचे सादरीकरण (Disclosure) या संदर्भातील पुराव्याच्या तपासणीचा समावेश असतो. लेखापरिक्षणामध्ये लेखाकर्माच्या तत्वाचा वापर व व्यवस्थापनाने केलेले महत्वाचे अंदाज याची तपासणी तसेच आर्थिक पत्रकामधील सर्वांगीण सादरीकरणाचे मुल्यांकन यांचाही समावेश असतो. लेखापरिक्षण अहवालातील मतप्रदर्शनाला पुरेसा आधार आहे अशी आमची खात्री आहे. उपरोक्त आर्थिक पत्रकाबद्दल आम्ही जोडलेल्या टिपणी व शे-यास पात्र राहून आम्ही अहवाल करतो की,

१) सदर बँकेचे प्रधान कार्यालय व सात शाखा यांचे लेखापरिक्षण आम्ही केले आहे.

२) आमच्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपुर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती माहिती व खुलासे आम्हास उपलब्ध झाले असून ती सर्व माहिती व खुलासे समाधानकारक आहेत.

३) आमच्या मते व आम्हाला मिळालेल्या माहिती व खुलाशाच्या आधारे आणि आम्ही केलेल्या व सोबत जोडलेल्या अहवालाच्या भाग अ ब व क मधील नमुद शेऱ्यास अनुसरुन संस्थेचे ताळेबंद व नफा तोटापत्रक महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० ला अनुसरुन तयार केलेले आहेत आणि आमच्या मते संपूर्ण महितीप्रमाणे तसेच आम्हास देण्यात आलेल्या खुलाशावरुन व लेखापरिक्षण अहवालाच्या भाग अ ब व क मधील नमुद शेऱ्यास अनुसरुन

अ) ताळेबंद व नफा-तोटा पत्रक संस्थेने ठेवलेल्या हिशोबपुस्तकाशी जुळते असून सदर ३१ मार्च २०२३ या दिनांकाचा ताळेबंद बँकेच्या व्यवहाराची / कामकाजाची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो आणि नफा तोटापत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफ्याची सत्य व वास्तव्य स्थिती दर्शवितो. (लेखापरिक्षण अहवालातील नफातोटा विवेचनातील शेऱ्यास पात्र राहून व महत्वाचे शेऱ्यास पात्र राहून)

ब) संस्थेचे हिशोब हे त्यावरील टिप्पणीस पात्र राहून महाराष्ट्र सहकारी संस्थाच्या कायद्यानुसार आवश्यक ती माहिती देणारे आहेत व संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची सत्य व वास्तवस्थिती दर्शवितात.

४)आमच्या मते एकत्रीत ताळेबंद बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९(ॲज ॲप्लीकेबल टू को-ऑपरेटिव्ह सोसायटी) चे तिसऱ्या परिशिष्ठातील नमुन्याप्रमाणे कर्ज या खात्यातील पोटकलमातील माहितीसह रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नियमानुसार तयार करण्यात आला आहे.

५) आमच्या मते पुस्तकाच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पतीस येईल त्यावरुन संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचा कायदा १९६० व त्याखालील नियम व संस्थेच्या पोटनियमाप्रमाणे अपेक्षीत असल्या प्रमाणे पुस्तके ठेवली आहेत.

६) सन २०२२-२३ या वर्षाकरता महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा १९६० खालील नियमानुसार व नवीन निकषाच्या आधारे बँकेस 'अ' वर्ग देणेत आला आहे.

मे. पाटील घेवडे महापूरकर ॲण्ड असोसिएटस्
सनदी लेखापरिक्षक
सही/-
**(के.एस.पाटील) भागीदार**
**(मेंबरशीप नं. ११८१०३)**
**(एफ.आर.एन-१२६००० W)**
UDIN: 23118103BGWHNE2090

स्थळ :- कोल्हापूर
दिनांक : १६/०६/२०२३

शिक्का

## जोडपत्र अ

| | | | |
|---|---|---|---|
| बँकेचे नाव | कोल्हापूर महिला सहकारी बँक लि., कोल्हापूर | | |
| मुख्य कार्यालय | १०८२ ख, बी वॉर्ड, तुतूची बाग, खासबाग कोल्हापूर - ४१६ ०१२ | | |
| ई-मेल | ho@kopmahilabank.com | | |
| नोंदणी क्रमांक | के. पी. आर./बी.एन.के.१५७ | | |
| दिनांक | १९ मे. १९७२ | | |
| रिझर्व्ह बँक परवाना | यु.बी.डी.एम. ए. एच. ११५५ पी<br>दि.१८ जुलै १९९५ | | |
| कार्यक्षेत्र | कोल्हापूर जिल्हा | | |
| तपशील | दि. ३१ मार्च २०२३ | | |
| | मुख्यालयासह शाखांची संख्या | ८ | |
| सभासद | नियमित (भागधारक) | १२३२२ | |
| | नाममात्र | २११६ | |
| | खपलेले भागभांडवल | ४५७.६६ | (आकडे लाखात) |
| | राखीव निधी व गंगाजळी | ११४२.७७ | |
| ठेवी | बचत (सेव्हींग्ज) ठेवी | १८४२.४५ | |
| | चालू (करंट) ठेवी | ५४२.९४ | |
| | मुदत व इतर ठेवी | ७४०२.५२ | |
| दिलेली कर्जे | तारणी कर्जे | ५१९१.१६ | |
| | विनातारणी कर्जे | ७०५.९७ | |
| | प्राधान्यपूरक क्षेत्र | ४८११.९८ | |
| | कर्जपुरवठा टक्केवारी | ९३.१६ % | |
| | दुर्बल घटकांना कर्ज | १८९६.५१ | |
| | कर्ज पुरवठा टक्केवारी | ३६.७२% | |
| गुंतवणूक | | ५०३५.१६ | |
| थकबाकी प्रमाण | | ८.१८% | |
| लेखापरिक्षण वर्ग | | अ | |
| नफा | | ७२.१७ | |
| सेवक संख्या | | ६२ | |
| खेळते भांडवल | | ११६९९.०७ | |

ठेव विमा व ऋण हमी महामंडळ कायदा १९६१ या कायद्याप्रमाणे ठेव विमा व ऋण विमा महामंडळ यांचेकडे दि. ३०/०९/२०२३ अखेरचा हप्ता बँकेने दि. ३१/०५/२०२३ रोजी भरणा केलेला आहे.

## सन २०२२ - २०२३ अखेर संचालिका व नातेवाईक यांना दिलेली कर्जे

| अ.नं. | तपशील | वर्षारंभी येणे रक्कम | सहकार वर्षात मंजूर रक्कम | सहकार वर्षात परत केलेली रक्कम | सहकार वर्षाअखेर येणे रक्कम | थकबाकी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | संचालक कर्जे | निरंक | | | | |
| २. | नातेवाईक कर्जे | | | | | |